# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-**
**{घनकचरा व्यवस्थापन विभाग}**

नागपूर महानगरपालिका हद्दीतील सर्व पाळीव श्वानाची नोंदणी खालीलप्रमाणे नमूद शर्ती अटीच्या अधीन राहून करून घेण्याकरीता प्रस्तावित आहे.

१. नागपूर महानगर पालिका हद्दीतील सर्व श्वान मालकांनी त्यांचे पाळीव श्वानाची नोंदणी महानगरपालिकेमध्ये करून घेणे बंधनकारक राहील.

२. श्वान नोंदणी करीता रू. ५०० /- प्रती वर्ष प्रति श्वान नोंदणी शुल्क आकारण्यात येईल.

३. एक कुटुंब जास्तीत जास्त ३ श्वानाची नोंदणी करू शकतील. ३ पेक्षा जास्त श्वान पाळणाऱ्या कुटुंबास विशेष परवाना घेणे आवश्यक राहील.

४. श्वानाच्या नोंदणी करीता तसेच विशेष परवाना करीता आवश्यक कागदपत्रे सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' नुसार सादर करावे लागतील.

५. नोंदणी करताना श्वानाला Anti Rabies चे लसीकरण केलेले असणे व त्याबाबतचे पंजिकृत पशुवैद्यकाचे सही शिक्का सह प्रमाणपत्र किंवा लसीकरण बाबतचा रेकॉर्ड सादर करणे आवश्यक आहे.

६. इंडियन श्वान पाळण्याकरिता प्रोत्साहन मिळावे याकरिता इंडियन श्वान पाळणाऱ्या कुटुंबास नोंदणी शुल्क केवळ रू. २००/- प्रती वर्ष प्रति श्वान आकारण्यात येईल.

७. इंडियन श्वान पाळणाऱ्या कुटुंबाने त्या श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया केलेली असल्यास नोंदणी शुल्क पूर्णतः माफ करण्यात येईल.

८. इंडियन श्वान व्यतिरिक्त इतर प्रजातीच्या श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया केलेली असल्यास, अशा श्वान मालकास नोंदणी शुल्क केवळ रू. २००/- प्रती वर्ष प्रती श्वान आकारण्यात येईल.

९. श्वानाची नसबंदी केलेल्या मालकास नसबंदी शस्त्रक्रिया करून घेण्यात आलेल्या पशुवैद्यक यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१०. श्वान मालकाने नसबंदी शस्त्रक्रिया /लसीकरण बाबत चे प्रमाणपत्र फर्जी/ चुकीचे प्रमाणपत्र आढळून आल्यास श्वान मालकावर रू. २०००० पर्यंतचा दंड आकारण्यात येईल. तसेच नसबंदी शस्त्रक्रिया न करता प्रमाणपत्र दिल्याचे आढळून आल्यास संबंधित पशुवैद्यक यांचेवर रू. २००००/- पर्यंत दंड आकारण्यात येईल.

११. श्वान नोंदणी बाबत जाहीर सूचना प्रसिध्द केल्यापासून ३ महिन्याचे आत सर्व श्वान मालकांनी नोंदणी करून घेणे आवश्यक राहील. या मुदतीनंतर नोंदणी करणाऱ्या श्वान मालकास प्रती दिवस रू. ५/- दंड आकारण्यात येईल.

१२. श्वान नोंदणी चे प्रमाणपत्र हे १ एप्रिल ते ३१ मार्च या आर्थिक वर्षा करिता लागू राहील.

१३. प्रत्येक वर्षाच्या १ ते ३० एप्रिल या कालावधी मध्ये नोंदणी करणे आवश्यक राहील. तदनंतर नोंदणी करणाऱ्या श्वान मालकास रू. ५/- प्रती दिवस प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

१४. विना परवाना किंवा नोंदणी न करता श्वान पाळताना आढळून आल्यास किंवा तक्रार प्राप्त झाल्यास प्रथम नोटीस बजावून नोंदणी करण्याची सूचना देण्यात येईल. ठराविक मुदतीत दंडा सह नोंदणी करून घेणे आवश्यक राहील. तसे न झाल्यास संबंधित श्वान मालकास रू. ५०००/- प्रशासकीय दंड आकारण्यात येईल.

१५. आकारण्यात येणारा दंड सर्व प्रकारच्या श्वाना करिता लागू राहील.

१६. श्वानांची नोंदणी सर्व क्षेत्रिय कार्यालयामध्ये करण्यात येईल. श्वान नोंदणी अधिकार क्षत्रिय कार्यालयामध्ये कार्यरत मुख्य स्वच्छता अधिकारी/ विभागीय अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहे. नोंदणी किंवा विशेष परवाना बाबत तक्रार किंवा अपील चे अधिकार क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त/ वार्ड अधिकारी यांना प्रदान करण्यात येत असून त्यांचा निर्णय अंतिम राहील.

१७. श्वान नोंदणी करिता शुल्क वसूल करणे, दंड आकारणे व वसूल करणे, तक्रारीचा निपटारा करणे इत्यादी अधिकार संबंधित क्षेत्रीय कार्यालयाचे मुख्य स्वच्छता अधिकारी/विभागीय अधिकारी आणि सहायक आयुक्त/ वार्ड अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहे.

१८. श्वान ओळख म्हणून मायक्रोचीप बसविणे योग्य राहील.

१९. श्वानाला बाहेर नेताना साखळी व Muzzle असणे आवश्यक राहील. बाहेर फिरवताना श्वानाने कुठेही विष्ठा टाकू नये. याकरिता सोबत Poop stick चा वापर करणे आवश्यक राहील.

वरीलप्रमाणे प्रस्ताव मा. प्रशासक यांच्या विचारार्थ सादर.

# **<u>पारीत ठराव</u>**

**ठराव क्रमांक :-** 135/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 10/11/2022

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार प्र. उपायुक्त तथा संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका हद्दीतील सर्व पाळीव श्वानाची नोंदणी खालीलप्रमाणे नमूद शर्ती अटीच्या अधीन राहून करून घेण्याकरीता प्रस्तावित आहे.

१. नागपूर महानगर पालिका हद्दीतील सर्व श्वान मालकांनी त्यांचे पाळीव श्वानाची नोंदणी महानगरपालिकेमध्ये करून घेणे बंधनकारक राहील.

२. श्वान नोंदणी करीता रू. ५०० /- प्रती वर्ष प्रति श्वान नोंदणी शुल्क आकारण्यात येईल.

३. एक कुटुंब जास्तीत जास्त ३ श्वानाची नोंदणी करू शकतील. ३ पेक्षा जास्त श्वान पाळणाऱ्या कुटुंबास विशेष परवाना घेणे आवश्यक राहील.

४. श्वानाच्या नोंदणी करीता तसेच विशेष परवाना करीता आवश्यक कागदपत्रे सोबत जोडलेल्या परिशिष्ट ‘अ’ नुसार सादर करावे लागतील.

५. नोंदणी करताना श्वानाला Anti Rabies चे लसीकरण केलेले असणे व त्याबाबतचे पंजिकृत पशुवैद्यकाचे सही शिक्का सह प्रमाणपत्र किंवा लसीकरण बाबतचा रेकॉर्ड सादर करणे आवश्यक आहे.

६. इंडियन श्वान पाळण्याकरिता प्रोत्साहन मिळावे याकरिता इंडियन श्वान पाळणाऱ्या कुटुंबास नोंदणी शुल्क केवळ रू. २००/- प्रती वर्ष प्रति श्वान आकारण्यात येईल.

७. इंडियन श्वान पाळणाऱ्या कुटुंबाने त्या श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया केलेली असल्यास नोंदणी शुल्क पूर्णतः माफ करण्यात येईल.

८. इंडियन श्वान व्यतिरिक्त इतर प्रजातीच्या श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया केलेली असल्यास, अशा श्वान मालकास नोंदणी शुल्क केवळ रू. २००/- प्रती वर्ष प्रती श्वान आकारण्यात येईल.

९. श्वानाची नसबंदी केलेल्या मालकास नसबंदी शस्त्रक्रिया करून घेण्यात आलेल्या पशुवैद्यक यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१०. श्वान मालकाने नसबंदी शस्त्रक्रिया /लसीकरण बाबत चे प्रमाणपत्र फर्जी/ चुकीचे प्रमाणपत्र आढळून आल्यास श्वान मालकावर रू. २०००० पर्यंतचा दंड आकारण्यात येईल. तसेच नसबंदी शस्त्रक्रिया न करता प्रमाणपत्र दिल्याचे आढळून आल्यास संबंधित पशुवैद्यक यांचेवर रू. २००००/- पर्यंत दंड आकारण्यात येईल.

११. श्वान नोंदणी बाबत जाहीर सूचना प्रसिध्द केल्यापासून ३ महिन्याचे आत सर्व श्वान मालकांनी नोंदणी करून घेणे आवश्यक राहील. या मुदतीनंतर नोंदणी करणाऱ्या श्वान मालकास प्रती दिवस रू. ५/- दंड आकारण्यात येईल.

१२. श्वान नोंदणी चे प्रमाणपत्र हे १ एप्रिल ते ३१ मार्च या आर्थिक वर्षा करिता लागू राहील.

१३. प्रत्येक वर्षाच्या १ ते ३० एप्रिल या कालावधी मध्ये नोंदणी करणे आवश्यक राहील. तदनंतर नोंदणी करणाऱ्या श्वान मालकास रू. ५/- प्रती दिवस प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

१४. विना परवाना किंवा नोंदणी न करता श्वान पाळताना आढळून आल्यास किंवा तक्रार प्राप्त झाल्यास प्रथम नोटीस बजावून नोंदणी करण्याची सूचना देण्यात येईल. ठराविक मुदतीत दंडा सह नोंदणी करून घेणे आवश्यक राहील. तसे न झाल्यास संबंधित श्वान मालकास रू. ५०००/- प्रशासकीय दंड आकारण्यात येईल.

१५. आकारण्यात येणारा दंड सर्व प्रकारच्या श्वाना करिता लागू राहील.

१६. श्वानांची नोंदणी सर्व क्षेत्रिय कार्यालयामध्ये करण्यात येईल. श्वान नोंदणी अधिकार क्षत्रिय कार्यालयामध्ये कार्यरत मुख्य स्वच्छता अधिकारी/ विभागीय अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहे. नोंदणी किंवा विशेष परवाना बाबत तक्रार किंवा अपील चे  अधिकार क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त/ वार्ड अधिकारी यांना प्रदान करण्यात येत असून त्यांचा निर्णय अंतिम राहील.

१७. श्वान नोंदणी करिता शुल्क वसूल करणे, दंड आकारणे व वसूल करणे, तक्रारीचा निपटारा करणे इत्यादी अधिकार संबंधित क्षेत्रीय कार्यालयाचे मुख्य स्वच्छता अधिकारी/विभागीय अधिकारी आणि सहायक आयुक्त/ वार्ड अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहे.

१८. श्वान ओळख म्हणून मायक्रोचीप बसविणे योग्य राहील.

१९. श्वानाला बाहेर नेताना साखळी व Muzzle असणे आवश्यक राहील. बाहेर फिरवताना श्वानाने कुठेही विष्ठा टाकू नये. याकरिता सोबत Poop stick चा वापर करणे आवश्यक राहील.

वरीलप्रमाणे प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

## परिशिष्ट 'अ'

**श्वानांच्या विशेष परवानाकरीता खालीलप्रमाणे माहिती आवश्यक आहे.**

अ) **इंडियन श्वान प्रजातीच्या श्वानांकरीता**

१) श्वान मालकाचे ओळखपत्र.
२) रहिवासीचा पुरावा.
३) अॅन्टीरॅबीजचे लसीकरण केल्याबाबतचा पुरावा.
४) श्वान ठेवण्याकरीता उपलब्ध जागेबाबत माहिती.
५) तीन पेक्षा जास्त श्वान पाळत असल्यास उपलब्ध जागेबाबत माहिती व त्यांना ठेवण्याची व्यवस्था.

ब) **इंडियन श्वान व्यतिरिक्त इतर प्रजातीच्या श्वानांकरीता**

१) श्वान मालकाचे ओळखपत्र.
२) रहिवासीचा पुरावा.
३) अॅन्टीरॅबीजचे लसीकरण केल्याबाबतचा पुरावा.
४) तीन पेक्षा जास्त श्वान पाळत असल्यास आजु- बाजुला राहणाऱ्या व्यक्तिचे ना हरकत प्रमाणपत्र.
५) तीन पेक्षा जास्त श्वान पाळत असल्यास उपलब्ध जागेबाबत माहिती व त्यांना ठेवण्याची व्यवस्था.